# प्रेसनोट दि. १४.०६.२०२०

**संजयनगर पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असले पोलीस हवालदार संतोष बाळकृष्ण फडतरे यांना २,०००/- रूपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांचे मुलावर संजयनगर पोलीस ठाणे येथे गुरनं.७६/२०२० अन्वये भा.दं.वि.स. क.३२४, ३३७, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये मदत करतो व चार्जशीट लवकर पाठवितो म्हणून पोलीस हवालदार फडतरे यांनी दहा हजार रुपयांची मागणी केली असले बाबतचा तक्रारी अर्ज दि.१२.०६.२०२० रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दिनांक १२.०६.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे केले पडताळणी कारवाईमध्ये पोलीस हवालदार फडतरे यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर आज दि.१४.०६.२०२० रोजी तक्रारदार यांना संजयनगर पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून २,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री संतोष बाळकृष्ण फडतरे, वय – ४६ वर्षे पोलीस हवालदार, ब.नं.५८०,नेमणुक संजयनगर पोलीस ठाणे यांचे विरुध्द संजयनगर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे, व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी, अविनाश सागर, संजय संकपाळ, संजय कलकुटगी, रविंद्र धुमाळ, श्रीपाद देशपांडे, सलीम मकानदार,धनंजय खाडे, प्रितम चौगुले, सोहेल मुल्ला,सारीका साळुंखे-पाटील,राधिका माने, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in